असा. क्र. ६५ रजिस्टर्ड नं. एमएच/एमआर/साऊथ-२२९/२००६-०८

# महाराष्ट्र शासन राजपत्र

असाधारण

प्राधिकृत प्रकाशन

शुक्रवार, डिसेंबर २९, २००६/पौष ८, शके १९२८

स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी या भागाला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.

## भाग चार

महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम.

अनुक्रमणिका

पृष्ठे

सन २००६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४६.—महाराष्ट्र विधानमंडळ सदस्यांचे निवृत्तिवेतन अधिनियम, १९७६ यामध्ये आणखी सुधारणा करण्यासाठी अधिनियम .. .. .. .. ४५४-४५५

दिनांक २८ डिसेंबर २००६ रोजी माननीय राज्यपालांनी संमती दिलेला महाराष्ट्र विधानमंडळाचा पुढील अधिनियम माहितीसाठी, याद्वारे प्रसिद्ध करण्यात येत आहे.

अ. मा. शिंदेकर,
सचिव,
महाराष्ट्र शासन,
विधी व न्याय विभाग.

---

## सन २००६ चा विधानसभा अधिनियम क्रमांक ४६.

(मा. राज्यपालांची संमती मिळाल्यानंतर महाराष्ट्र शासन राजपत्रात, दिनांक २९ डिसेंबर २००६ रोजी प्रथम प्रसिद्ध केलेला अधिनियम.)

**महाराष्ट्र विधानमंडळ सदस्यांचे निवृत्तिवेतन अधिनियम, १९७६ यामध्ये आणखी सुधारणा करण्यासाठी अधिनियम.**

**ज्याअर्थी**, यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांकरिता, महाराष्ट्र विधानमंडळ सदस्यांचे निवृत्तिवेतन अधिनियम, १९७६ चा महा. १ १९७६, यामध्ये आणखी सुधारणा करणे इष्ट आहे ; **त्याअर्थी**, भारतीय गणराज्याच्या सत्तावन्नाव्या वर्षी, याद्वारे पुढील अधिनियम करण्यात येत आहे :—

संक्षिप्त नाव. १. या अधिनियमास, महाराष्ट्र विधानमंडळ सदस्यांचे निवृत्तिवेतन (तिसरी सुधारणा) अधिनियम, २००६ असे म्हणावे.

सन १९७७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १ याच्या कलम ३ ची सुधारणा. २. महाराष्ट्र विधानमंडळ सदस्यांचे निवृत्तिवेतन अधिनियम, १९७६, याच्या कलम ३, पोट-कलम (१) मधील, दुसऱ्या परंतुकामध्ये, " विधिमंडळाचा सदस्य म्हणून अपात्र ठरल्यास, त्यास " या मजकुराऐवजी, " भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद १९१ च्या खंड (१) अन्वये, राज्य विधानमंडळाचा सदस्य असण्यास अपात्र ठरेल तर, तिला " हा मजकूर दाखल करण्यात येईल आणि तो, दिनांक १ सप्टेंबर २००० पासून दाखल करण्यात आला असल्याचे मानण्यात येईल. १९७७ चा महा. १.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.